10 JUN 2021

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# उत्तर गोलार्धातून दिसले 'रिंग ऑफ फायर'

## या वर्षातील पहिले सूर्यग्रहण पाहण्याची खगोलप्रेमींना पर्वणी

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

या वर्षातील पहिले कंकणाकृती सूर्यग्रहण गुरुवारी झाले. मुख्यतः उत्तर गोलार्धातील ईशान्य कॅनडा, ग्रीनलँड व सायबेरियाच्या भागांमधून कंकणाकृती सूर्यग्रहण पाहता आले. कंकणाकृती सूर्यग्रहण भारतातून जरी दिसले नसले तरी खगोलप्रेमी नागरिक, विद्यार्थ्यांना इंटरनेटच्या माध्यमातून हे कंकणाकृती सूर्यग्रहण पाहण्याची पर्वणी मिळाली.





जेव्हा सूर्यग्रहणाच्या वेळी चंद्र पृथ्वीपासून त्याच्या सर्वाधिक लांब अंतरावर राहून सूर्य व पृथ्वीच्या मध्ये येऊन सूर्याच्या प्रकाशाला झाकून टाकतो, तेव्हा कंकणाकृती सूर्यग्रहण पाहण्यास मिळते. या सूर्यग्रहणात चंद्र जास्त अंतरावर असल्यामुळे तो सूर्याला पूर्णपणे झाकू शकत नाही. अशावेळी सूर्याची वर्तुळाकार कडी चंद्राच्या पाठीमागे एखाद्या कंकणासारखी म्हणजे बांगडीसारखी दिसून येते, त्यालाच 'कंकणाकृती सूर्यग्रहण' म्हणतात. कंकणाकृती सूर्यग्रहणच्या या स्थितीला खगोलप्रेमी 'रिंग ऑफ फायर,' अग्निवलय, अग्निकंकण असेही संबोधतात. जेव्हा चंद्र सूर्याच्या थोडासा आड आल्यामुळे सूर्याचा थोडासा भाग झाकला जातो, या ग्रहणास खंडग्रास किंवा अल्पग्रास किंवा आंशिक ग्रहण म्हणतात.

भारतीय प्रमाण वेळेनुसार आंशिक ग्रहणास दुपारी १ वाजून ४२ मिनिटांनी सुरुवात झाली. कंकणाकृती ग्रहण सर्वप्रथम ईशान्य कॅनडा येथून दुपारी ३ वाजून १९ मिनिटांनी दिसण्यास सुरुवात झाली. त्याचा मध्य दुपारी ४ वाजून ११ मिनिटांनी होता. त्यावेळेस ग्रीनलँड येथून कंकणाकृती सूर्यग्रहण दिसत होते. शेवटी संध्याकाळी ५ वाजून ३ मिनिटांनी उत्तर रशिया आणि सैबेरियातून कंकणाकृती ग्रहण दिसले. आंशिक ग्रहणाचा शेवट मध्य चीन येथून संध्याकाळी ६ वाजून ४२ मिनिटांनी झाला. भारतातून लडाख व अरुणाचल प्रदेश येथील नागरिकांना सूर्यास्ताच्या अगोदर ५ ते ७ मिनिटे आंशिक ग्रहण पाहता आले, अशी माहिती शिवाजी विद्यापीठाच्या अवकाश संशोधन केंद्राचे समन्वयक डॉ. राजीव व्हटकर यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 JUN 2021
पुढारी

# ऑनलाईन परीक्षा देण्याचा पर्याय निवडण्यासाठी रविवारपर्यंत मुदत



कोल्हापूर : पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी विद्यापीठामार्फत घेण्यात येणाऱ्या हिवाळी सत्राकरिता यापूर्वी ऑफलाईन पद्धतीने पर्याय निवडला आहे किंवा कोणताच पर्याय निवडला नाही, अशा विद्यापीठ अधिविभाग, सलंग्नित महाविद्यालय, दूरशिक्षण केंद्राकडील विद्यार्थ्यांना ऑनलाईन पद्धतीने परीक्षा देण्याचा पर्याय निवडण्यासाठी दि. १३ जूनपर्यंत मुदत देण्यात आली आहे. ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२० हिवाळी सत्राच्या विद्यापीठामार्फत घेण्यात आलेल्या अभ्यासक्रमाच्या परीक्षेमधील ऑफलाईन पद्धती निवडलेल्या किंवा कोणताच पर्याय न निवडलेल्या व शासन निर्णयानुसार कोरोनाच्या पार्श्वभूमीवर शेवटची संधी म्हणून फक्त ऑनलाईन पद्धतीने परीक्षा घेण्यात येणार आहे. विद्यापीठाच्या संकेतस्थळावर लिंकचा पर्याय विद्यार्थी स्तरावर उपलब्ध करून दिला आहे. तदूनंतर कोणतीही मुदतवाढ दिली जाणार नाही, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
1[illegible] JUN 2021
पुढारी

# 'सेट' अर्जासाठी १७ जूनपर्यंत मुदत

**पुणे :** कोरोना महामारीच्या प्रादुर्भावाचा विचार करता ज्या उमेदवारांना आतापर्यंत अर्ज भरता आले नाहीत, त्यांना अर्ज भरण्याची संधी मिळावी यासाठी सेट परीक्षेचे अर्ज भरण्यास १७ जूनपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. विद्यापीठ अनुदान आयोगातर्फे महाराष्ट्र व गोवा राज्यात २६ सप्टेंबर २०२१ रोजी होणाऱ्या ३७ व्या राज्य पात्रता परीक्षेचा (सेट) अर्ज भरण्याची मुदत १० जूनऐवजी आता १७ जूनपर्यंत वाढविण्यात आली आहे.